सकाळ, सोमवार, ६ जून, २०११, पृष्ठ क्र. ८

पुण्यातून पाहा कोणत्याही शहरातील आकाश!

विविध कारणांमुळे बंद असलेले न्यू इंग्लिश स्कूलमधील जुने तारांगण २१ वर्षांनंतर पुन्हा सुरू

पुणे, ता. ५ : गेली दोन दशके विविध कारणांमुळे बंद राहिलेले टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलमधील 'तारांगण' आता नव्या स्वरूपात सुरू झाले आहे. आकाशनिरीक्षणाचा छंद जोपासणाऱ्या खगोलप्रेमींना आता कोणत्याही देशातील, कोणत्याही शहरातील आकाशाची स्थिती पाहण्याची सुविधा यामुळे उपलब्ध झाली आहे.

न्यू इंग्लिश स्कूलचे १९५४ मध्ये नानावाड्यातून टिळक रस्त्यावर स्थलांतर झाले. शाळेच्या या नवीन वास्तूत काही तरी आगळेवेगळे असावे, या विचारातून शाळेचे त्या वेळचे मुख्याध्यापक पु. ना. वीरकर यांनी १९५४ मध्ये आकाशनिरीक्षणासाठी हे कृत्रिम तारांगण शाळेत उभारले. वालचंद ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या देणगीतून अमेरिकेतील स्पिट्झ कंपनीने बनविलेले आशियातील पहिले कृत्रिम तारांगण पुण्यात सुरू झाल्याचे, तारांगण प्रमुख विनायक रामदासी यांनी सांगितले. १९९० पर्यंत अनेक विद्यार्थी, खगोलप्रेमी यांनी आकाशनिरीक्षणाचा आनंद लुटला. मात्र त्यानंतर या यंत्रातील काही भाग खराब झाले आणि हे यंत्र बंद पडले.



तारांगणाच्या दुरुस्त केलेल्या यंत्रणेची माहिती देताना विनायक रामदासी.

परंतु २००८ या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र वर्षानिमित्त हे तारांगण पुन्हा सुरू करण्याचा विचार न्यू इंग्लिश स्कूल शालेय समितीचे अध्यक्ष दिलीप कोटीभास्कर यांनी मांडला. त्यानुसार खगोलतज्ज्ञ पराग महाजनी, फर्ग्युसन महाविद्यालयातील भौतिकशास्त्राचे प्राध्यापक एस. जी. कुलकर्णी आणि रामदासी यांनी बंद पडलेले कुसुमबाई मोतीचंद तारांगण पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अथक प्रयत्नांनंतर हे नादुरुस्त यंत्र सुरू करण्यात यश आले आणि आता जगभरात अन्यत्र कोठेही चालू अवस्थेत नसलेले सर्वांत जुने ऑप्टिकल प्रतिमेचे तारांगण यंत्र पुण्यात सुरू झाले. या कामात पुण्यातील अनेक खगोलप्रेमींनी त्यांना मदत केली.

या यंत्राला काही उपकरणे जोडलेली असून त्याच्या साह्याने अवकाशातील संकल्पना स्पष्ट होतात. जिओ सेंट्रिक अर्थ या उपकरणाच्या साह्याने एकाच वेळी पृथ्वीवरील कोणत्याही ठिकाणचे आकाश पाहता येते. ॲस्ट्रॉनॉमिकल ट्रँगलच्या साह्याने त्रिकोणमिती ही संकल्पना विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगता येते. मेरिडियन उपकरणाच्या साह्याने ताऱ्यांचे अक्षांश काढता येतात. प्लॅनेट्स को-ऑर्डिनेट्सच्या मदतीने सूर्याचा भासमान मार्ग, क्रांती वृत्त, आयनिक वृत्त, वैश्विक वृत्त समजून घेता येते.

पुढच्या टप्प्यात तारांगणाच्या घुमटातील ध्वनिक्षेपण सुधारण्यात येईल. ४ जूनला (शनिवारी) विज्ञानभारतीच्या सुमारे शंभर विद्यार्थ्यांसाठी तारांगणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आता, इतर शाळांनाही सायंकाळी सहानंतर आकाशदर्शनाचा आनंद लुटता येणार आहे. या संदर्भात शाळांनी न्यू इंग्लिश स्कूल येथे ०२०-२४३३६०२९ या क्रमांकावर संपर्क साधावा.